# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

"शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती"

सत्यमेव जयते

"शाहू - विचारांना देवूया गती साधूया सर्वांगीण प्रगती"

## सारथी विषयी थोडक्यात माहिती

- कंपनी कायदा २०१३ चे कलम ८ खाली नोंदणी दिनांक २५ जून, २०१८.
- सारथी संस्थेचे मुख्य कार्यालय - पुणे
- महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी ही संस्था नियोजन विभागाच्या अधिपत्त्याखाली कामकाज.
- संस्थेचे बोधचिन्ह - छत्रपती शाहू महाराजांचा "राज मुकूट"
- संस्थेचे बोधवाक्य - "शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती"
- नाशिक येथे सारथी संस्थेचे उपकेंद्र दि. २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी पासून सुरू करण्यात आले आहे.

### १. संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा मार्गदर्शन -

- UPSC २०२२ मध्ये १७ विद्यार्थ्यांची अंतिम यादीत निवड झाली.
- सारथी संस्थेमार्फत नवी दिल्ली व पुणे येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेत २५० विद्यार्थ्यांना UPSC पूर्व परीक्षेचे प्रशिक्षण घेण्यासाठी. प्रशिक्षण संस्थेचे संपूर्ण प्रशिक्षण शुल्क सारथीमार्फत अदा.
- प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी स्वतंत्र अर्थसहाय्य व मासिक विद्यावेतन अदा.
- संघ लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेसाठी तसेच मुलाखतीसाठी पात्र होणा-या विद्यार्थ्याला आर्थिक सहाय्य.
- झूम मीटिंग तसेच अभिरुप मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची मुख्य परीक्षा व मुलाखतीसाठी खास तज्ञ मार्गदर्शन.

### २. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा मार्गदर्शन -

- MPSC २०२३ मध्ये १०३ विद्यार्थ्यांची अंतिम यादीत निवड. यापैकी ५ विद्यार्थ्यांची उपजिल्हाधिकारी, ६ विद्यार्थ्यांची पोलिस उपअधीक्षक, ५ विद्यार्थ्यांची जिल्हा उपनिबंधक व १० विद्यार्थी सहाय्यक आयुक्त नगरपालिका या पदावर निवड.
- पुणे येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेत २५० विद्यार्थ्यांना MPSC पूर्व परीक्षेचे प्रशिक्षण. संपूर्ण प्रशिक्षण शुल्क, आकस्मिक खर्चासाठी स्वतंत्र अर्थसहाय्य मासिक विद्यावेतन सारथीमार्फत अदा.
- MPSC मुख्य परीक्षेसाठी तसेच मुलाखतीसाठी पात्र होणा-या विद्यार्थ्याला आर्थिक सहाय्य.

### ३. एम.फील. / पीएच. डी. करणा-या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती -

- मान्यताप्राप्त विद्यापीठाचे एम.फील. किंवा पीएच.डी. करणारे पात्र विद्यार्थी अर्ज करू शकतात.
- JRF साठी अधिछात्रवृत्ती रु. ३१,०००/- दरमहा व SRF साठी रु. ३५,०००/- दरमहा अधिछात्रवृत्ती, तसेच UGC नियमानुसार HRA, आकस्मिक खर्च अदा.
- सदर योजनेअंतर्गत आज रोजीपर्यंत २,१०९ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ.

### ४. सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम २०२२ -

- महाराष्ट्रातून किमान १०,००० विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रशिक्षण
- संगणक हाताळण्यासाठीचे MS OFFICE चे तंत्रज्ञान कौशल्य
- संगणक नेटवर्कींगमधील मुलभूत व प्रगत कौशल्य
- सांख्यिकी माहितीचे मुलभूत व प्रगत व्यवस्थापन
- वाणिज्य व आर्थिक स्वरुपाचे विश्लेषण करण्यासाठी Tally ERP 9

### ५. इंडो जर्मन टुल रूम (IGTR) यांच्या मार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण

- इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद मार्फत औरंगाबाद, नागपुर, कोल्हापुर व पुणे या ठिकाणी मोफत अनिवासी कौशल्य विकास प्रशिक्षण
- प्रशिक्षण कालावधी : २ महिने ते १ वर्ष

## ६. दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना परीक्षा -

- इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सारथीमार्फत शिष्यवृत्ती योजना.
- राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (NMMS) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व केंद्र सरकारची शिष्यवृत्ती रक्कम मिळत नसणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक ९,६००/- अर्थसहाय्य.
- सन २०२२-२३ मध्ये लक्षित गटातील १०,४१४ विद्यार्थ्यांना लाभ.

## ७. "मातोश्री" मुलींचे वसतिगृह -

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी - मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठी मातोश्री मुलींचे वसतिगृह सरस्वती नगर, धात्रक फाटा, नाशिक येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता सुरू करण्यात येत आहे.

## ८. इतर महत्वाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन -

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, कृषीसेवा , वनसेवा, दुय्यम सेवागट ब (अराजपत्रित), कर्मचारी चयन आयोग (स्टाफ सिलेक्शन) इ. स्पर्धा परीक्षांकरीत प्रशिक्षण शुल्क अदा.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या NET / MH-SET परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण सुविधा.

## ९. सारथीमार्फत प्रकाशित करण्यात येणारे साहित्य -

- छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथाच्या ५०,००० प्रती सारथीमार्फत छपाई.
- महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कायालये, महानगरपालिका, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत, पंचायत समिती कार्यालये, शासन मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, नगरपंचायती, नगरपालिका व  शासकीय ग्रंथलये यांना मोफत वितरीत.

## १०. भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document - २०३०)

- समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने योजनांची आखणी करणे.
- शेतीपूरक व्यवसायाला चालना देणे.
- स्थानिक पीकांनुसार प्रक्रिया उद्योग उभारणे.
- महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग वाढविणे.
- लक्षित गटांतील तरुणांचे कौशल्य विकसीत करुन रोजगार निर्माण करणे.
- संशोधनास आर्थिक सहाय्य देणे व विद्यार्थ्यांना पुरस्कृत करणे.
- शेतक-यांचे व महिलांचे क्लेश दूर करण्याबाबत उपक्रम घेणे.
- लिंगभेद , जातीभेद, वर्णभेद , अंधश्रध्दा यांचे निर्मूलन, हुंडापध्दती, कौटुंबिक हिंसाचार निर्मूलन इ. बाबी समाविष्ट आहेत.

**सदर सर्व योजना तपशीलवार पाहण्यासाठी सारथीच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्या.**

- **https://sarthi-maharashtragov.in**


**पुणे मुख्य कार्यालय**

पत्ता : बालचित्रवाणी, सी. टी. सर्वे नं. १७३, बी/१, गोपाळगणेश आगरकर रोड, पुणे - ४११ ००४.

Website : https://sarthi-maharashtragov.in

**नाशिक विभागीय कार्यालय**

पत्ता :  बॅरेक नंबर -8, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१ .

फोन नं. ०२५३-२९९३६८९